दि. १३.१०.२०२३

# प्रेस नोट

आरोपी लोकसेवक १. विजय चिंतामण भोये वय –४६ वर्षे पद – उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्ग–१, लातूर जिल्हा – लातूर २. प्रमोद उत्तम सोनसाळी वय ४४ वर्षे, धंदा नोकरी, पद – कनिष्ठ लिपिक, प्रादेशिक परिवहन विभाग, लातूर, ३. जिलानी मेहबूब शेख, वय–४९ वर्षे, पद खाजगी इसम(एजंट), रा. इंडिया नगर अमन कॉलनी, लातूर **यांच्या विरूध्द कलम ७, ७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांचा ट्रॅव्हल्स चा व्यवसाय असून त्यांनी 'ना वापर' प्रकारात असलेली एक ट्रॅव्हल्स गाडी 'वापर' प्रकारात आणून त्यावरचा टॅक्स वाढविण्यासाठी आलोसे क्र १ विजय भोये यांनी सुरुवातीस ५०००/– रुपयेची व तडजोडी अंती ३०००/– रुपयेची पंचासमक्ष लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम आलोसे क्र २ प्रमोद उत्तम सोनसाळी, लिपीक प्रादेशिक परिवहन विभाग,वर्ग ३, लातूर यांच्या कडुन स्विकारण्याचे कबुल केले. सदरची लाचेची रक्कम ३०००/– रुपये आलोसे क्र २ प्रमोद उत्तम सोनसाळी, लिपीक प्रादेशिक परिवहन विभाग,लातूर यांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर येथे पंचासमक्ष स्वत: स्विकारली. लाच रक्कम रक्कम स्विकारण्यासाठी आलोसे क्र ३ जिलानी मेहबूब शेख, खाजगी इसम यांनी प्रोत्साहन दिले आहे. सर्व आरोपींना रंगेहात पकडण्यात आले.

वरील प्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे घटक यांचे कडुन झालेल्या सापळा कारवाई वरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर घटकाच्या दोन पथकानी लागलीच वरील दोन आरोपी लोकसेवकांच्या घरी छापे टाकुन घरझडती केली असता घरझडती दरम्यान काही एक संशयीत रक्कम अथवा दस्ताऐवज आढळुन आलेली नाही. वरील प्रमाणे झालेल्या सापळा कारवाई वरून पोलीस स्टेशन विवेकानंद चौक लातूर, येथे गुरन 615/२०२३ कलम ७, ७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये 04/55 वाजता गुन्हा दाखल झाला असुन पुढील तपास पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि. लातूर हे करीत आहेत. यातील तिन्ही आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |
| ८) | Twitter | :– | ACBlatur |
| ९) | Instagram | :– | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :– | anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर

(पंडीत रेजितवाड)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner